# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

### मराठी विभाग

लोकमत

# राजगुरु महाविद्यालयात विंदांच्या

लोकमत न्यूज नेटवर्क



हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी विभागाच्यावतीने आयोजित 'विंदांची त्रिपदी' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**राजगुरुनगर :** 'ज्ञानपीठ' पुरस्कारप्राप्त कवी विंदा करंदीकर यांच्या कवितेची रसरशीत जीवनासक्ती, क्रांतिकारी सामाजिक जाणीव आणि संस्कृतीतून फुललेल्या प्रतिमा ही त्रिपदी असून, प्रेम, निसर्गगंध, संगीत व त्याबरोबर भोवतालाचं जबरदस्त आकलन इत्यादींचे विलोभनीय दर्शन त्यांच्या कवितेत घडत असल्याचे प्रतिपादन विंदांचे चिरंजीव व पुण्याच्या विचारवेध संस्थेचे समन्वयक आनंद करंदीकर यांनी केले. हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने आयोजित 'विंदांची त्रिपदी' या कार्यक्रमात ते बोलत होते.

कवितावाचन, विवेचन आणि चित्रफितीच्या माध्यमातून विंदांच्या आठवणी, त्यांनी सादर केलेल्या कविता असे या कार्यक्रमाचे स्वरुप होते. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील अध्यक्षस्थानी होते. या प्रसंगी विचारवेधच्या समन्वयक सरिता आवाड, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. ए. जी. कुलकर्णी उपस्थित होते.

या कार्यक्रमात आनंद करंदीकर व सरिता आवाड यांनी विंदांच्या कवितांचे प्रयोजन आणि रुपरेषा स्पष्ट करताना विंदांची काव्यदृष्टी आणि जीवनदृष्टी विद्यार्थ्यांना सांगितली. त्यांनी विंदांच्या निवडक कवितांचे सादरीकरण करताना 'चुकली दिशा तरीही, आजी, म्हातारी, यंत्रावतार, दीपचंदी, झपताल' अशा अनेक कविता सादर केल्या. 'तेच ते झपताल, घेता, माझ्या मना बन दगड,

Hello Pune Gramin
Page No. 2 Jan 18, 2020
Powered by: erelego.com

6:59 · 75%

सकाळ

# राजगुरुनगरला विद्यार्थ्यांनी अनुभवली विंदांची त्रिपदी

**राजगुरुनगर, ता. १६ :** ''कविवर्य विंदा करंदीकर यांच्या कवितेची रसरशीत जीवनासक्ती, क्रांतिकारी सामाजिक जाणीव आणि संस्कृतीतून फुललेल्या प्रतिमा ही त्रिपदी आहे. प्रेम, निसर्ग गंध, संगीत व भवतालाचे आकलन आदींचे विलोभनीय दर्शन त्यांच्या कवितेत घडते,'' असे प्रतिपादन विंदांचे चिरंजीव व पुण्याच्या विचारवेध संस्थेचे समन्वयक आनंद करंदीकर यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाने आयोजित केलेल्या 'विंदांची त्रिपदी' कार्यक्रमात ते बोलत होते. कविता वाचन, विवेचन, चित्रफितीच्या माध्यमातून विंदांच्या आठवणी आणि त्यांनी सादर केलेल्या कविता, असे या कार्यक्रमाचे स्वरूप होते. या वेळी आनंद करंदीकर व विचारवेधच्या समन्वयक सरिता आवाड यांनी विंदांच्या चुकली दिशा तरीही, आजी, म्हातारी, यंत्रावतार, दीपचंदी, झपताल आदी कविता सादर केल्या. तेच ते, झपताल, घेता, माझ्या मना बन दगड, सब घोडे बारा टक्के, ती जनता अमर आहे आदी कविता चित्रफितीच्या माध्यमातून विंदांच्या आवाजात ऐकवल्या.




**राजगुरुनगर (ता. खेड) : 'विंदांची त्रिपदी' सादर करताना आनंद करंदीकर, सरिता आवाड.**

'सगळे मिळून सगळ्यांसाठी जगण्यामध्ये ब्रह्मानंद,' हा विंदांनी सांगितलेला जगण्याचा मंत्र सर्वांनी जपण्याचे आवाहन करंदीकर यांनी केले.

विचारवेध संस्थेने घेतलेल्या निबंध स्पर्धेतील विजेते सुदर्शन चौधरी, अशोक माने, डॉ. संजय शिंदे, ललिता आवळे, शीतल रौंधळ यांना या वेळी गौरविण्यात आले. मराठी विभागाने मराठी भाषा पंधरवडानिमित्त घेतलेल्या पोस्टर स्पर्धेतील सिद्धार्थ सावंत, सायली कोळेकर, प्रशांत सिनलकर यांना आणि साहेबराव बुटे-पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त घेतलेल्या हस्ताक्षर स्पर्धेतील राहुल सरोदे, संचिता मोरे, अमित गोगावले या विद्यार्थ्यांनाही गौरविण्यात आले. डॉ. संजय शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी सूत्रसंचालन केले.

लोकमत

# 'त्रिपदी'वर काव्यास्वाद

◆ विंदांच्या अनेक काव्यसंग्रहांच्या मुखपृष्ठाचा स्लाईड शो विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला. विचारवेध, पुणेच्यावतीने घेण्यात आलेल्या खुल्या निबंध स्पर्धेत महाराष्ट्रात प्रथम आलेले नारायणगावच्या सुदर्शन चौधरी तसेच अशोक माने, डॉ. संजय शिंदे, ललिता आवळे, शीतल रौंधळ यांना उत्तेजनार्थ बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

सब घोडे बारा टक्के, ती जनता अमर आहे' अशा काही कविता चित्रफितीच्या माध्यमातून विंदांच्या आवाजात विद्यार्थ्यांना ऐकवल्या. विंदांच्या त्रिपदीचा शेवट 'जगण्यामध्ये ब्रह्मानंद' या आयुष्याचे तत्त्वज्ञान सांगणाऱ्या कवितेने झाला. 'सगळे मिळून सगळ्यांसाठी जगण्यामध्ये ब्रह्मानंद' हा विंदांनी सांगितलेला जगण्याचा मंत्र सर्वांनी जपण्याचे आवाहन आनंद करंदीकर यांनी केले.

मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा पंधरवड्यानिमित्त घेण्यात आलेल्या मराठी कवितेचा अंतर्भाव असलेल्या पोस्टर स्पर्धेतील सिद्धार्थ सावंत, सायली कोळेकर, प्रशांत सिनलकर तसेच साहेबरावजी बुट्टे-पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त घेण्यात आलेल्या हस्ताक्षर स्पर्धेतील राहुल सरोदे, संचिता मोरे, अमित गोगावले या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.

डॉ. संजय शिंदे यांनी प्रास्ताविक करताना विद्यार्थ्यांना कवितावाचनाची गोडी लागावी, कविता समजून घेण्याची सवय लागावी, त्यातील तत्त्व कळावे आणि रसग्रहण करता यावे, यासाठी 'विंदांची त्रिपदी' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले. डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी आभार मानले.

Hello Pune Gramin
Page No. 2 Jan 18, 2020
Powered by: erelego.com

# राजगुरू महाविद्यालयात विंदांच्या त्रिपदीवर आधारित काव्यास्वाद



राजगुरुनगर : ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त कवी विंदा करंदीकर यांच्या कवितेची रसरशीत जीवनसक्ती, क्रांतिकारी सामाजिक जाणीव आणि संस्कृतीतून फुललेल्या प्रतिमा ही त्रिपदी असून प्रेम, निसर्ग गंध, संगीत व त्याबरोबर भोवतालचं

जबरदस्त आकलन इत्यादीचे विलोभनीय दर्शन त्यांच्या कवितेत घडत असल्याचे प्रतिपादन विंदांचे चिरंजीव व पुण्याच्या विचारवेध संस्थेचे समन्वयक आनंद करंदीकर यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने आयोजित 'विंदांची त्रिपदी' या कार्यक्रमात बोलत होते.

कविता वाचन, विवेचन आणि चित्रफितीच्या माध्यमातून विंदांच्या आठवणी, त्यांनी सादर केलेल्या कविता असे या कार्यक्रमाचे स्वरूप होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. या प्रसंगी विचारवेधच्या समन्वयक सरिता आवाड, प्राचार्य डॉ. एच.एम. जरे, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा.

या कार्यक्रमात आनंद करंदीकर व सरिता आवाड यांनी विंदांच्या कवितांचे प्रयोजन आणि रूपरेषा स्पष्ट करताना विंदांची काव्यदृष्टी आणि जीवनदृष्टी विद्यार्थ्यांना सांगितली. त्यांनी विंदांच्या निवडक कवितांचे सादरीकरण करताना चुकली दिशा तरीही, आजी, म्हातारी, यंत्रावतार, दीपचंदी, झपताल अशा अनेक कविता सादर केल्या. तेच ते झपताल, धेता, माझ्या मना बन

आहे अशा काही कविता चित्रफितीच्या माध्यमातून विंदांच्या आवाजात विद्यार्थ्यांना ऐकवल्या.

विंदांच्या त्रिपदीचा शेवट 'जगण्यामध्ये ब्रम्हानंद' या आयुष्याचे तत्त्वज्ञान सांगणाऱ्या कवितेने झाला. 'सगळे मिळून सगळ्यांसाठी जगण्यामध्ये ब्रम्हानंद' हा विंदांनी सांगितलेला जगण्याचा मंत्र सर्वांनी जपण्याचे आवाहन आनंद करंदीकर यांनी केले. या वेळी विंदांच्या

विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला.

विचारवेध, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या खुल्या निबंध स्पर्धेत महाराष्ट्रात प्रथम आलेल्या नारायणगावच्या सुदर्शन चौधरी तसेच अशोक माने डॉ. संजय शिंदे, ललिता आवळे, शितल रौंधळ यांना उत्तेजनार्थ बक्षीस देऊन गौरविण्यात आले. मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा पंधरवड्यानिमित्त घेण्यात आलेल्या मराठी कवितेचा अंतर्भाव असलेल्या पोस्टर स्पर्धेतील सिद्धार्थ सावंत, सायली कोळेकर, प्रशांत सिनलकर तसेच साहेबरावजी बुटेपाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त घेण्यात आलेल्या हस्ताक्षर स्पर्धेतील राहुल सरोदे, संचिता मोरे, अमित गोगावले या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.

डॉ. संजय शिंदे यांनी प्रास्ताविक करताना विद्यार्थ्यांना कविता वाचनाची गोडी लागावी, कविता समजून घेण्याची सवय लागावी, त्यातील तत्त्व कळावे आणि रसग्रहण करता यावे यासाठी ' विंदांची त्रिपदी' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख